महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
# प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे - ४११ ००५
e-mail : est.ropune@dvet.gov.in Phone No.२५५३५४१५/१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. अ-१/आस्था/अंसेजे/२०२४/6325

दिनांक :- 28 NOV 2024

परिपत्रक :-

विषय :- दिनांक ०१/०१/२०२४ रोजी कार्यरत असलेल्या विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या अंतिम सेवाजेष्ठता याद्या प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. अ-१/आस्था/अंसेजे/२०२४/५२४८-अ,दि.१३-०९-२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये गणित /चित्रकला निदेशक व शिल्पनिदेशक वगळून उर्वरित संवर्गातील सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सुधारित आढाव्यानुसार गणित /चित्रकला निदेशक यांचे समायोजन गणित तथा चित्रकला निदेशक व शैक्षणिक अर्हतेनुसार शिल्पनिदेशक पदी झाल्याने संबधित कर्मचारी यांचे सेवाज्येष्ठता दिनांक ग्राहय धरणेबाबत अनेक कर्मचा-यांचे तक्रार अर्ज प्राप्त झालेले होते. त्यामुळे सदर गणित तथा चित्रकला निदेशक व शिल्पनिदेशक कर्मचारी यांचे सेवाज्येष्ठता दिनांक ग्राहय धरणेबाबत संचालनालय,मुंबई यांचे मार्गदर्शन मागविण्यात होते. अद्यापपर्यंत संचालनालयाकडून कोणतेही मार्गदर्शनपर पत्र प्राप्त झालेले नाही. तथापि सदर दोन्ही संवर्गाचे अंतिम सेवाज्येष्ठता तात्काळ प्रसिध्द करणेबाबत मौखक सूचना प्राप्त झालेले आहेत.

त्याअनुषंगाने गणित /चित्रकला निदेशक व शिल्पनिदेशक या संवर्गाचे अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत येतील.

| अ.क्र. | पदाचा संवर्ग | वेतनस्तर |
|---|---|---|
| १ | शिल्प निदेशक / व्यवसाय निदेशक | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |
| २ | गणित तथा चित्रकला निदेशक | एस-१४ : ३८६०० - १२२८०० |

सदरच्या अंतिम सेवाजेष्ठता यादया या कार्यालयाच्या संकेतस्थळावर https://pune.dvet.gov.in / ई-मेलद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तरी संस्था/कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेत कार्यरत असलेल्या सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या अंतिम सेवाजेष्ठता यादया डाऊनलोड करुन संबंधित कर्मचाऱ्यांचे (रजेवर, प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसह) निदर्शनास आणून द्याव्यात व तशी पोहोच कर्मचाऱ्यांकडून घेऊन कार्यालयाच्या अभिलेखावर ठेवण्यात यावी.

या परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

(सी.जे.ढेकणे)
प्र.सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, पुणे

सोबत :- अंतिम सेवाज्येष्ठता याद्या.

प्रत :- या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संबंधित संस्था/कार्यालय प्रमुखांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत :- या कार्यालयातील सर्व संबंधित कर्मचारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- मा.संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना माहितीसाठी सविनय सादर. (कार्यासन क्रमांक ४)